| | |
|---|---|
| MHJN100008452025 | दाखल दिनांकः १४/०७/२०२५<br>नोंदणी दिनांकः १४/०७/२०२५<br>**निकाल दिनांकः ०४/०५/२०२६**<br>कालावधीः **०० व. ०९ म. २१ दि.** |

**मंठा येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – श्रीमती एल. पी. धन्वे)

**नि. दि. दा. क्र. १८१/२०२५** **निशाणी क्र. २५**

**बँक ऑफ महाराष्ट्र,**

बँकिंग कंपन्या (अधिग्रहण आणि हस्तांतरण कायदा)
१९७० अंतर्गत नोंदणीकृत बँक, जिचे मुख्य कार्यालय
लोकमंगल १५०१, शिवाजी नगर, पुणे-५, महाराष्ट्र,
शाखा मंठा, मार्फत शाखा व्यवस्थापक

**आशिष यादवराव येळणे,**

वय ३६ वर्षे, धंदा – नौकरी,

रा. मंठा, ता. मंठा, जि. जालना ... **वादी**

**– विरुध्द –**

१. **निवृत्ती भगवानराव इंगळे,**

वय सज्ञान, धंदा – शेती

रा. लिंबोना, ता. मंठा, जि. जालना

२. **राजेभाऊ उखाजी उकंडे,**

वय सज्ञान, धंदा – शेती

रा. लिंबोना, ता. मंठा, जि. जालना ... **प्रतिवादी**

********************************************************

**वादीतर्फे विधिज्ञ श्री. डी.एस. लिंबुळकर**
**प्रतिवादीतर्फे एकतर्फा**

****************************************************

## न्यायनिर्णय

(घोषीत केल्याची तारीख ०४/०५/२०२६)

प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी रक्कम रुपये ४,०३,५१५/- व त्यापुढील व्याज ११.९०% द.सा.द.शे प्रमाणे वसुल होवुन मिळणेकरिता दाखल आहे.

**वादीचे थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे :-**

**०२.** वादी बँकिंग कंपन्या (अधिग्रहण आणि उपक्रम हस्तांतरण) अधिनियम १९७० अंतर्गत स्थापन झालेली आणि बँकिंगचा व्यवसाय करणारी एक बँक आहे. प्रतिवादी क्र. १ ने **कृषि टर्म लोन योजने अंतर्गत ठिबक कर्ज** (यापुढे सोयीसाठी **कर्ज** असे संबोधण्यात येते) योजने अंतर्गत शेतीसाठी कर्ज मिळण्याकरीता अर्ज केला. व्यवसायाच्या अनुषंगाने बँकेने २८/१०/२०१४ रोजी रुपये १,२०,०००/- चे कर्ज मंजूर केले, जे मंजुरी पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार परतफेड करणे अपेक्षित होते. त्यानंतर, प्रतिवादीने वादी बँकेच्या नियमांनुसार विविध कागदपत्रे सादर केली, ज्यात कर्ज मागणी अर्ज, कर्ज मंजुरी पत्र, कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचे अर्ज पत्र, मागणी वचनपत्र, कर्जाच्या रकमेची पावती आणि कर्जदारकडून शिल्लक आणि सुरक्षा पुष्टीकरण पत्र यांचा समावेश होता. त्यांनी तारण आणि हमी करारांवर सह्या केल्या. प्रतिवादी क्रमांक १ ने

आपली जमीन गट क्रमांक ११९ ज्याचे क्षेत्र २ हे. ३६ आर जी मौजे लिंबोना, ता. मंठा, जि. जालना येथे आहे, बँकेच्या नावे तारण ठेवली. प्रतिवादी क्रमांक २ या कर्जासाठी जामीनदार म्हणून उभे राहिले आणि बँकेच्या नावे हमीपत्र व ईतर करार केले. प्रतिवादी क्रमांक १ ने सर्व अटी व शर्ती मान्य केल्या होत्या. त्यानुसार, कर्जाची रक्कम वितरित करण्यात आली आणि ती कर्ज खाते क्रमांक ६०१८९१५८२४८ मधून काढण्यात आली. ठरल्याप्रमाणे कर्जाची रक्कम परत करण्यास प्रतिवादी अपयशी ठरले.

**३.** वारंवार समन्स बजावूनही, प्रतिवादी क्र. १ व २ न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे, त्यांच्या अनुपस्थितीत, प्रकरण त्यांच्याविरुद्ध **एकतर्फा** चालवण्यात आले.

**४.** वादी यांची कथने विचारात घेवून खालील मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात ज्याचे सकारण निष्कर्ष हे खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हे सिध्द करतात का की, प्रतिवादींकडे रक्कम रुपये ४,०३,५१५/– थकबाकी आहेत ? | **होय.** |
| २ | वादी हे सिध्द करतो का की, तो प्रतिवादींकडुन थकबाकी रक्कमेची वसुली करण्यास पात्र आहे ? | **होय.** |
| ३ | वादी प्रतिवादींकडुन थकबाकी रक्कमेची पुर्ण वसुली होईपर्यंत ११.९०% द.सा.द.शे. प्रमाणे मिळण्यास पात्र आहे का ? | **अंशतः होय, ६% द.सा.द.शे** |

| | | |
|---|---|---|
| ४ | काय आदेश व हुकुमनामा ? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीताः</u>–**

**०५.** प्रस्तुत दाव्याच्या सिध्दतेसाठी वादीतर्फे अमित मदन भोयर यांचा पुरावा नि.क्र. ६ वर नोंदविला आहे. तोंडी पुराव्याबरोबर वादीने काही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. नि. क्र. ४ च्या कागदयादीने वादीने नि.क्र. ८ वर कर्ज मागणी अर्ज जोडला आहे, नि.क्र. ९ वर कर्ज मंजुरी पत्र जोडले आहे. कर्ज दिल्याची पावती नि.क्र. १० वर दाखल केली आहे. नि.क्र. ११ वर डिमांड प्रॉमीसरी नोट दाखल केली आहे. नि.क्र. १२ वर कॅशक्रेडीट मिळण्यासाठीचा विनंती अर्ज दाखल केला आहे. नि.क्र. १३ वर हायपॉथीकेशन डिड दाखल केले आहे. नि.क्र. १४ वर दि. १३.०९.२०१७ रोजीचे कर्जदार यांचे बॅलेंस व सिक्युरीटी कनफरमेशन लेटर दाखल केले आहे. नि.क्र. १५ वर दि. २४.०८.२०२० रोजीचे कर्जदार यांचे बॅलेंस व सिक्युरीटी कनफरमेशन लेटर दाखल केले आहे. नि.क्र. १६ वर दि. १२.०७.२०२३ रोजीचे कर्जदार यांचे बॅलेंस व सिक्युरीटी कनफरमेशन लेटर दाखल केले आहे. नि.क्र. १७ वर दि. १३.०९.२०१७ रोजीचे तारणदार यांचे बॅलेंस व सिक्युरीटी कनफरमेशन लेटर दाखल केले आहे. नि.क्र. १८ वर दि. २४.०८.२०२० रोजीचे तारणदार यांचे बॅलेंस व सिक्युरीटी कनफरमेशन लेटर दाखल केले आहे. नि.क्र. १९ वर दि. १२.०७.२०२३ रोजीचे तारणदार यांचे बॅलेंस व

सिक्युरीटी कनफरमेशन लेटर दाखल केले आहे. बँकेने प्रतिवादीस पाठविलेली नोटीस नि.क्र. २० वर दाखल केली आहे. नि.क्र. २१ वर डिड ऑफ गॅरंटी दाखल केली आहे. वादीने नि.क्र.७ च्या कागदयादीने खातेउतारा/स्टेटमेंट ऑफ अकाऊंट दाखल केले असून त्यास नि.क्र. २२ देण्यात येत आहे. तसेच वादीस अधिकृत केल्याच्या ठरावाची प्रत नि.क्र. २४ वर दाखल केली आहे. नि.क्र. २५ वर पुरसीस दाखल करुन वादीने त्याचा पुरावा बंद केला आहे.

**०६.** दाव्याचे कथनांच्या पृष्ठर्थ, वादीतर्फे अधिकृत अमित मदन भोयर यांनी स्वतःचा पुरावा नि.क्र. ६ वर दाखल करुन दाव्यातील कथनांची पुर्नरावृत्ती केली आहे. प्रस्तुत दाव्यात अभिलेखावर दाखल करण्यात आलेली कागदपत्रे (नि.क्र. ८ ते नि.क्र. २४), वादीतर्फे सादर करण्यात आलेला पुरावा तसेच वादीची कथने, प्रतिवादी हे दाव्याच्या कामी हजर राहिलेले नाहीत त्यामुळे विनाआव्हानित राहिले. तसेच, त्याने स्वतःचा स्वतंत्र पुरावा देवुन वादीची कथन खंडीत केलेली नाहीत.

**०७.** वादीने दिलेला संपुर्ण तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १ याने वादी बॅकेकडुन ठिबककरीता दि. २८/१०/२०१४ रोजी रक्कम रुपये १,२०,०००/- द.सा.द.शे. ११.९०% व्याज दराने कर्जाऊ घेतले होते. सदरची कर्जाची रक्कम दि. २८/१०/२०१४ रोजी प्रतिवादी च्या कर्ज खाते क्र. ६०१८९१५८२४८ मध्ये जमा झाल्याची कर्ज खाते उता-यावरुन स्पष्ट होते.

**०८.** प्रतिवादीच्या कर्जखात्यावर एकुण रकम ४,०३,५१५/– इतकी रक्कम व्याजासह येणे बाकी असल्याने ती रक्कम कर्ज खात्यावर भरणेबाबत वादी बॅकेने प्रतिवादीला कायदेशीर नोटीस (नि.क्र. २) पाठविली होती. ती मिळाल्यानंतर देखील प्रतिवादीने देय रक्कम दिली नसल्यामुळे प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादीने हजर होवुन वादीचा पुरावा अव्हानित केलेला नाही. त्यामुळे वादीच्या मौखील व कागदोपत्री पुराव्यावरुन प्रतिवादी हे वादी बॅकेस रक्कम रुपये ४,०३,५१५/– देय आहेत हे सिध्द होते.

**०९.** तसेच प्रतिवादींनी वादी बँकेच्या हक्कात विविध करार करवून दिलेले असून सदरील कर्जाचे देय रक्कमेस प्रतिवादी वैयक्तिक जबाबदार आहेत. प्रतिवादींनी वादीने त्यांना पाठविलेली डिमांड नोटीस (नि.क्र. २०) पासुन निकाल तारखेपर्यंत कोणतीही रक्कम अदा केलेली नाही. तसेच, वादीचा पुरावा हा विनाआव्हानित राहिलेला आहे. त्यामुळे, दावा दाखल तारखेपासुन वादी हा प्रतिवादीकडुन रक्कम रुपये ४,०३,५१५/– व्याजासह वसुल करणेस पात्र राहतील. **करीता मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवत आहे.**

**मुद्दा क्र.३ करीताः**–

**१०.** वादीने थकबाकी रक्कम पुर्ण वसूल होईपर्यंत ११.९०% दराने भावी

व्याजाची मागणी केली आहे. वादीचा साक्षीदार क्र. १ अमित भोयर यांचा पुरावा सुसंगत आहे. अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले तथापि माझे मत आहे की वादी ही राष्ट्रीय आणि सार्वजनिक वित्तीय संस्था आहे आणि तिचे पैसे हे सर्वस्वी जणतेचे पैसे आहेत. म्हणून, वादीला ४,०३,५१५/- रुपयांच्या थकबाकी रकमेची पुर्णपणे वसुली होईपर्यंत भविष्यातील व्याज मिळण्यास पात्र आहे. या बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४ चा अभ्यास करणे योग्य ठरेल. कलम ३४ मध्ये असे म्हटले आहे की, सामान्यतः भविष्यातील व्याज ६% दराने पेक्षा जास्त नसावे, तथापि, अंतर्भूत तरतुदीमध्ये असे म्हटले आहे की, जर थकबाकी रक्कम ही व्यावसायिक कर्जातून झाली असेल तर त्यावर दंड कर आकारण्यात येवू शकतो. परंतु ती राष्ट्रीयीकृत बँकांच्या कराराच्या दरापेक्षा जास्त नसावी. सध्याच्या प्रकरणात कर्ज हे कृषी कर्ज आहे आणि ते व्यावसायिक कर्ज म्हणून गृहित धरले जाऊ शकत नाही. म्हणून, माझ्या मते ६% दराने भावी व्याज आकारणे योग्य होईल. म्हणून, **मी मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर अंशतः होय असे नोंदवित असून प्रतिवादीने वादीस थकबाकी रक्कमेची पुर्णपणे वसुली होईपर्यंत ६% द.सा.द.शे. प्रमाणे व्याज द्यावे.**

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>**

**११.** वरील सर्व विवेंचनावरुन हे सिध्द होते की, वादीने प्रथमदर्शनी दावा सिध्द केलेला आहे. वादी ही राष्ट्रीयकृत बँक असून त्यांना दाव्यात सहभागी होण्यास भाग पाडले गेले

म्हणून ती खर्च मिळण्यास देखील पात्र आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. सदरचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी रक्कम रुपये ४,०३,५१५/- द.सा.द.शे. ६% दराने दावा दाखल तारखेपासुन वादीस द्यावयाची आहे.

३. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करणेत यावा.

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.05.04 17:16:01 +0530

दिनांक- ०४/०५/२०२६.

**(श्रीमती एल. पी. धन्वे)**
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर)
मंठा.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.
लघुलेखकाचे नावे- अक्षय ईश्वर देशपांडे
न्यायालयाचे नाव- दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर), मंठा
न्यायनिर्णयाची दिनांक - ०४/०५/२०२६

Sd/-xxxx
लघुलेखक (नि.श्रे.)